॥ आज राणी, पूर्विंची ती प्रीत तूं मागूं नको ॥

गायकः सुधीर फडके
गीतः वा. रा. कांत
संगीतः यशवंत देव

आज राणी, पूर्विंची ती प्रीत तूं मागूं नको
कालचे वेड्या फुलांचे रंग तूं मागूं नको ॥ धृ. ॥

सांज का चाफ्याकळीचे चुटपुटीचे भेटणे
पानजाळीतून चिरपे बावरेसे चांदणे।
त्या क्षणांचें, चांदण्यांचें स्पर्श तू मागू नको
आज राणी, पूर्विंची ती प्रीत तूं मागूं नको॥ १ ॥

पाकळ्यांचे शब्द ओठी तू हळू निश्वासता
वाजती गात्रीं सतारी नेत्रपाती झाकता।
त्या फुलांचें, त्या स्वरांचें गीत तू मागू नको
आज राणी, पूर्विंची ती प्रीत तूं मागूं नको॥ २ ॥

रोखुनी पलकांत पाणी घाव सारे साहिले
अन् सुखाच्या आसवांचें मीठ डोळां साचले।
या घडीला मोतियाचा घास तूं मागूं नको
आज राणी, पूर्विंची ती प्रीत तूं मागूं नको ॥ ३ ॥

काय बोलु श्वास भारे चांदणें डहुळेल का?
उमलण्याचे सुख फिरूनी त्या फुला सोसेल का?
नित नवीं मरणें मराया जन्म तूं मागूं नको
आज राणी, पूर्विंची ती प्रीत तूं मागूं नको ॥ ४ ॥